ePaper

# स्वातंत्र्यदिनी राज्यातील 186 कैद्यांची होणार सुटका!



| वर्ष - 7 | अंक - 104 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

हर घर तिरंगा

www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक 15 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# नव्या शिक्षण धोरणामुळे अध्ययनात गतिमानता!

## » राज्यपाल रमेश बैस: डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा 14 वा पदवीदान समारंभ संपन्न

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वातंत्र्यानंतर प्रथमच आपण क्रांतिकारी असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारत आहोत. या धोरणाद्वारे अध्ययन प्रक्रीयेत गतिमानता आणण्याचा प्रयत्न आहे. यामुळे भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा आणखी उंचावणार असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची संधी उपलब्ध झाली आहे. भारत देश २०३५ पर्यंत शिक्षणासाठी सकल नोंदणी गुणोत्तराचे (जीईआर) ५० टक्के हे अपेक्षित लक्ष्य गाठेल, असा विश्वास आहे. आपल्या लोकसंख्येचे रुपांतरण संपत्तीमध्ये करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले**





डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठाच्या १४ व्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते कायनेटिक समूहाचे अध्यक्ष अरुण फिरोदिया, प्राज इंडस्ट्रीज लि. चे संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी आणि बेंगळुरू येथील रामय्या संस्था समूहाच्या गुणवत्ता हमी व उत्कृष्टता कक्षाचे प्रधान सल्लागार डॉ. पी. एन. राजदान यांना मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमास डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, प्र. कुलपती डॉ. भाग्यश्री पाटील, कुलगुरु डॉ. एन. जे. पवार, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित होते. राज्यपाल बैस म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स- एआय) आणि मशीन लर्निंगच्या उदयाच्या पार्श्वभूमीवर, संपूर्ण शिक्षण व्यवस्थेतच बदल होणार आहेत. आज केवळ साक्षर असणे पुरेसे नाही तर एआय साक्षर असणे आवश्यक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. ते शिकण्याच्या आणि शिकवण्याच्या पद्धती, रोगाचे निदान आणि उपचार या दोन्हींवर परिणाम करणार आहे. उर्वरित जगाच्या तुलनेत आपण एआयमध्ये मागे आहोत. परंतु देशातील युवा पिढी तंत्रज्ञानातील बदलांशी सहज जुळवून घेणारी असल्याने त्याचा भविष्यात लाभ होईल. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या येणाऱ्या युगात आयुष्यभर आणि सतत शिकत रहावे लागेल. पुढे राहण्यासाठी आपल्या लोकांना कौशल्य, पुन: कौशल्यप्राप्ती आणि कौशल्ये उन्नत करण्यासाठी तयार असले पाहिजे. एकापेक्षा अनेक कौशल्ये शिकणे भारतीयांना एआय आणि मशीन लर्निंगमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांपासून वाचण्यास मदत करेल, असेही राज्यपाल म्हणाले.

यावेळी कुलपती डॉ. पी. डी. पाटील म्हणाले, एका संस्थेपासून प्रारंभ करुन संस्थेन ९ हून अधिक संस्था स्थापन केल्या. वैद्यकशास्त्र, नर्सिंग, दंतचिकित्सा, आयुर्वेद, होमिओपॅथी आदी अनेक विद्याशाखांचा विस्तार केला. उच्च गुणवत्तेमुळे विद्यापीठाला नॅक 'ए++' अधिस्वीकृती प्राप्त झाली आहे. विद्यापीठाच्या रुग्णालयाला अवयव प्रत्यारोपणाचा परवाना असून आतापर्यंत ३०० पेक्षा अधिक अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी केल्या आहेत. पदवी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना आता अनेक संधी उपलब्ध झाल्या असून त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असेही ते म्हणाले.

### 33 विद्यार्थ्यांना सुवर्ण पदके

» यावेळी फिरोदिया, डॉ. चौधरी आणि डॉ. राजदान यांनीही मनोगत व्यक्त केले. या समारंभात विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमधील परीक्षांमध्ये प्रावीण्य संपादन केलेल्या ३३ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदके देऊन सन्मानित करण्यात आले. विविध विद्याशाखेतील ४ हजार ९५ स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये १४ विद्यावाचस्पती (पीएच.डी.), ३ हजार १५ पदव्युत्तर पदवी, १ हजार ५५ पदवी आणि ११ पदविका या अशा एकूण ८ विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

# पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांना मैलामिश्रित पाण्याचा पुरवठा!

## चिखली येथील देहू-आळंदी रोडवरील सोसायटी धारक त्रस्त

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चिखली येथील देहू-आळंदी रोडवरील सोसायटीधारकांना गेल्या अनेक दिवसांपासून मैलामिश्रित पाण्याचा पुरवठा होत आहे. ड्रेनेज लाईनचे पाणी पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनमधे मिसळत असल्याने ही समस्या निर्माण झाली. वारंवार तक्रार करूनही त्याच्या दुरूस्तीकडे महापालिकेचा पाणीपुरवठा विभाग दुर्लक्ष करत आहे. त्या विरोधात नागरिक संताप व्यक्त करत आहेत. त्वरीत यावर उपाययोजना करण्याची मागणी चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनच्या वतीने करण्यात आली आहे. नुकतेच नागरिकांनी आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे ही तक्रार केली आहे.**



चिखली येथील देहू-आळंदी रोडवरील अभंग विश्व फेज-1, अभंग विश्व फेज-2, मिरा ऑर्किड, भागीरथी ग्लोरिया, गवारे अंगण या सर्व सोसायट्यांमधे मैलामिश्रित पाणी येत आहे. या सर्व सोसायट्यांमधील लहान मुले, महिला, वयोवृद्ध नागरिक हे जुलाब, उलट्या यासारख्या आजाराने त्रस्त आहेत. या भागामध्ये जाणारी ड्रेनेज लाईन आणि पिंपरी चिंचवड महापालिकेची पाण्याची लाईन एकत्रच जात असल्याने ड्रेनेज लाईनचे पाणी पिण्याच्या पाण्याच्या लाईन मध्ये मिसळत आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना आणि संबंधीत अधिकाऱ्यांना ही बाब निदर्शनास आणून दिली आहे. तरी या बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

> “ चिखली येथील देहू-आळंदी रोडवरील या सहा सोसायट्यांमधे मागील 15 दिवसांपासून मैलामिश्रित दूषित पाणी येत आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला संबंधीत परिस्थिती निदर्शनास आणून दिली आहे. त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्वरीत दुरूस्ती करून शुद्ध पाण्याचा पुरवठा न केल्यास फेडरेशनच्या वतीने मैला मिश्रित पाणी घेऊन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना प्यायला देऊ.

महापालिकेच्या या गलथान कारभारामुळे या परिसरातील सुमारे 4 हजार नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्याला आळा घालणे



आवश्यक आहे. त्यासाठी ड्रेनेजच्या पाईपलाईन दुरूस्ती करावी. पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन मध्ये मिसळणारे मैलामिश्रित पाण्याला थांबवावे. तोपर्यंत या भागातील सोसायटी धारकांना होणारा पाणीपुरवठा थांबवावा. टँकरद्वारे शुद्ध पाणीपुरवठा करावा, अशी मागणी संजीवन सांगळे यांनी केली आहे. तसेच मैलामिश्रित पाण्याचा पुरवठा होण्याची समस्या कायमस्वरूपी बंद करावी, अशी मागणीही फेडरेशनच्या वतीने आयुक्तांना केली.

---

# पोलिस आयुक्तांचे ‘राष्ट्रपती पदक’ शहरासाठी अभिमानास्पद!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची भावना

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी चिंचवड शहर पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांना राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याबद्दल पिंपरी-चिंचवड शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात जगताप यांनी म्हटले आहे की, पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांची राष्ट्रपती पदकासाठी



निवड झाली ही अत्यंत आनंदाची बाब आहे. आपल्या शहराच्या आयुक्तांना हा सन्मान प्राप्त होत असल्याने ही बाब शहरासाठीही अभिमानास्पद आहे. पिंपरी-चिंचवडचे आयुक्त या नात्याने विनय कुमार चौबे यांनी शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जागरुकपणे प्रयत्न केले. गैरकृत्यांवर वचक निर्माण करताना सर्वसामान्य नागरिकांशी आपुलकीचा संवाद निर्माण केला.

तसेच, शहरातील पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन पोलिस दलाला जास्तीत जास्त जनताभिमुख करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सातत्याने सुरु असतात. त्या प्रयत्नांसह त्यांच्या पुढील कारकिर्दीला या सन्मानाने निश्चित बळ मिळणार आहे. राष्ट्रपती पदकाने सन्मान होणे ही कोणत्याही पोलिस अधिकार्यासाठी अत्यंत सन्मानाची, आनंदाची बाब. तो सन्मान, आनंद पोलिस आयुक्त चौबे यांना लाभला आहे. पोलिस दलात त्यांनी दाखवलेल्या कर्तबगारीबद्दल त्यांना हा गौरव प्राप्त होत आहे. यापुढील काळातही त्यांच्याकडून अशाच प्रकारची कर्तबगारी पार पडून जनतेला दिलासा देणारे कार्य घडावे, अशीही अपेक्षा जगताप यांनी व्यक्त करुन पोलिस आयुक्तांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्वातंत्र्यदिनी राज्यातील १८६ कैद्यांची होणार सुटका

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

सध्या देशात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर देशातील विविध कारागृहांत शिक्षा भोगत असलेल्या आणि चांगल्या वर्तणुकीच्या कैद्यांना विशेष माफी देण्याचे निर्देश केंद्रीय गृह मंत्रालयाने दिले आहेत. राज्याच्या विविध कारागृहांतील विशिष्ट प्रवर्गाच्या कैद्यांना तीन टप्प्यांमध्ये ‘माफी’ देण्यात येणार आहे. त्यानुसार पहिल्या दोन टप्प्यात यापूर्वी ३९५ कैद्यांना सोडण्यात आले आहे. आता १५ ऑगस्ट रोजी १८६ कैद्यांना कारागृहातून मुक्त करण्यात येणार आहे. दरम्यान, राज्यातील कैद्यांसंदर्भात विशेष माफी योजनेसाठी अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तपासणी समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीमार्फत शिफारस करण्यात आलेल्या कैद्यांच्या प्रस्तावास राज्यपालांची मान्यता घेण्यात आली आहे. महाराष्ट्र कारागृह विभागामार्फत तीन टप्प्यांमध्ये एकूण ५८१ कैद्यांना विशेष माफी देऊन कारागृहातून मुक्त करण्यासंबंधी कार्यवाही करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये १५ ऑगस्ट २०२२ रोजी २०६ कैदी, दुसऱ्या टप्प्यामध्ये २६ जानेवारी २०२३ रोजी १८९ कैद्यांना कारागृहातून मुक्त करण्यात आले आहे.

# बहारदार नृत्याविष्काराने रंगला स्वरसागर महोत्सव

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशन आयोजित रौप्य महोत्सवी स्वरसागर सांस्कृतिक महोत्सवाच्या दुस -या दिवशी म्हणजे रविवारी (१३ ऑगस्ट) सुरुवातीला जलदिंडी प्रतिष्ठान आयोजित वसुंधरा बचाव हा समूह नृत्याचा कार्यक्रम सादर करण्यात आला. पवना नदी सुधार आणि बचाव या संकल्पनेतून जलदिंडी प्रतिष्ठानचे काम सुरु आहे. पिंपरी चिंचवडची जीवनवाहिनी असलेली पवना नदी काळाच्या ओघात शहरात आल्यानंतर सध्या अत्यंत प्रदूषित झाली आहे. तिच्या जतनासाठी आणि संवर्धनासाठी वाढता लोकसहभाग ही काळाची गरज आहे. त्यामुळे 'रिव्हर पोलिसिंग ही एक अभिनव संकल्पना जलदिंडी प्रतिष्ठानच्या माध्यमातून या निमित्ताने येथे मांडण्यात आली. या नृत्याच्या कार्यक्रमात सिटीप्राईड स्कूल, ब्राह्मणवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थिनी आणि ज्ञानप्रबोधिनी, निगडी शाळेच्या विद्यार्थिनींनी अत्यंत दिमाखदार आणि विचार करायला लावणारे नृत्याविष्कार सादर केले. वसुंधरा बचाव, जलसंवर्धन हा सध्याचा सर्वात प्राधान्यक्रमाचा नारा असला पाहिजे यावर त्यांनी अत्यंत उद्बोधक पद्धतीने नृत्य सादर केले.

दुस-या सत्रात नुपूर नृत्यालयाच्या डॉ. सुमेधा गाडेकर व त्यांच्या शिष्यांनी 'तत्वम कथक व त्यापलीकडे' या संकल्पनेवर आधारित नृत्य सादर केले.





## भूमिका

**पाकिस्तानही यंदा आपला अमृत महोत्सव साजरा करतोय. भारताची फाळणी करून, रक्ताचे पाट वाहून बनलेल्या पाकिस्तानात आज काय चाललंय? गेल्या ७५ वर्षात तिथं एकही सरकार धड काम करू शकलेलं नाही. कोलमडलेली अर्थव्यवस्था,धार्मिक दहशतवाद आणि कॉन्व्हेंटमधे शिकलेल्या श्रीमंतांच्या हाती असलेली लष्करी राजसत्ता. या सगळ्यामुळे तिथल्या लोकशाहीचं काय होणार, हे फक्त पाकसाठी नव्हे, तर जगासाठी महत्वाचं आहे.**

# पाकिस्तानात लोकशाही रुजणार की कुजणार?

पाकिस्तानात माजी पंतप्रधान इम्रान खान यांना मागील तीन महिन्यात दुसर्‍यांदा तुरुंगात टाकण्यात आलं आहे. इम्रान यांच्याविरुद्ध सुरू असलेल्या एकूण १२० न्यायप्रविष्ट प्रकरणांपैकी बहुतांश प्रकरणे भ्रष्टाचाराशी संबंधित आहित. यापैकी 'तोशाखाना' नावाने ओळखण्यात येणाऱ्या प्रकरणात त्यांना तीन वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा आणि एक लाख पाकिस्तानी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. पाकिस्तानच्या निवडणूक कायद्यांनुसार या शिक्षेमुळे इम्रान पुढील पाच वर्षे निवडणूक लढण्यास अपात्र ठरले आहेत. मागील वर्षीच्या एप्रिल महिन्यात इम्रान खान यांना पंतप्रधानपदावरून दूर सारण्यात विरोधी पक्षांना यश आलं. त्यानंतर त्यांना न्यायालयीन खटल्यांमधे अडकवत राजकारणातून निष्प्रभ



करण्याचा डाव नव्या सत्ताधार्‍यांनी आणि पाकिस्तानच्या लष्कराने रचला. इम्रान यांच्या सरकारनंसुद्धा पूर्वासुरीच्या सत्ताधार्‍यांना चौकशी आणि न्यायालयाच्या फेऱ्यांमध्ये अडकवत नामोहरम करण्याचा प्रयत्न केला होता, हे विसरून चालणार नाही. मे महिन्यात ज्यावेळी इम्रान खान यांना 'अल-कादीर' प्रकरणात अटक करण्यात आली होती, त्यावेळी पाकिस्तानात किमान १२ तास हिंसक निदर्शने झाली होती. मात्र, यावेळी इम्रान यांच्या बाजूने समर्थक रस्त्यावर उतरलेले नाहीत.

याचाच अर्थ, इम्रान यांची लोकप्रियता आणि त्यांना मिळत असलेले समर्थन खालावले आहे असे नाही. मे महिन्यातील हिंसक निदर्शनांनंतर, विशेषत: लष्करी संपत्तीचे नुकसान झाल्यानंतर पाकिस्तानी लष्कर आणि सरकारने इम्रान समर्थकांचे सर्वप्रकारे कंबरडे मोडण्यास सुरुवात केलीय. लष्कराच्या रावळपिंडीतील मुख्यालयावर हल्लाबोल होण्याच्या घटनेनंतर इम्रान समर्थकांविरोधात कडक पाश आवळले गेलेत.

इम्रान यांच्या राजकीय पक्षाची यंत्रणा खिळखिळी करण्यापासून ते इम्रान समर्थकांवर दहशतवाद, देशद्रोह आणि इस्लामविरोधी असल्याचे खटले दाखल करण्यात आले आहेत. यामुळे, सध्या इम्रान समर्थकांनी रस्त्यावरील विरोध प्रदर्शनापेक्षा निवडणुकीतच स्वत:ची शक्ती पणास लावण्याचे ठरविले असण्याची शक्यता आहे. खरं तर इम्रान खान यांचं सरकार फार लोकप्रिय नव्हते. विशेषतः, पाकिस्तानची घसरती अर्थव्यवस्था आणि काश्मीर प्रश्नाचे फेरआंतरराष्ट्रीयीकरण करण्यातील अपयश हे इम्रान यांच्याविरोधात जाणारे मोठे मुद्दे होते. त्यात इम्रान यांनी सत्तेत असताना विविध केंद्रीय यंत्रणांमार्फत विरोधी पक्षातील नेत्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपात नामोहरम करून सोडले होते.

या सगळ्यामुळे इम्रान यांची राष्ट्रीय नेता म्हणून स्वीकारार्हता निर्माण होऊ शकली नव्हती. पण इम्रान यांना सत्तेतून घालविल्यानंतर सत्तारूढ झालेल्यांना ना पाकिस्तानची आर्थिक घसरण थांबवता आली, ना काश्मीर प्रश्नाचे फेरआंतरराष्ट्रीयीकरण करता आले. ही बाब सामान्य जनतेच्या नजरेतून सुटलेली नाही. त्याचवेळी, पक्षफुटीद्वारे अविश्वास ठराव आणत इम्रान यांना सत्तेतून बाहेर केल्यामुळे त्यांच्याविरोधात जाणारे मुद्दे आज बाजूस पडले आहेत. पंतप्रधानपदावरून पदच्युत झाल्यानंतर इम्रान यांच्या बाजूने पाकिस्तानात सहानुभूतीची प्रचंड मोठी लाट उसळली आहे. याची जाणीव असलेल्या इम्रान यांनी सातत्याने मुदतपूर्व सार्वत्रिक निवडणुका घेण्याची मागणी लावून धरली होती. पाकिस्तानात आज कुठल्याही निवडणुका झाल्या, तरी इम्रान यांच्या 'पीटीआय' पक्षाला घवघवीत यश मिळणार, अशी चिन्हे आहेत. त्यामुळे निवडणुका खरेच वेळेत होतील का?

## संपादकीय »

### श्री '४२०' नाही; तरी..

***फौजदारी गुन्हेविषयक तीन संहितांची 'पूर्ण' पुनर्रचना करण्यात येत असल्याची घोषणा गृहमंत्री अमित शहा यांनी केली.***

फौजदारी गुन्हेविषयक तीन संहितांची 'पूर्ण' पुनर्रचना करण्यात येत असल्याची घोषणा गृहमंत्री अमित शहा यांनी केली. कोणत्याही सरकारी धोरणाच्या वल्गना आणि वास्तव यांत आमूलाग्र अंतर असते. त्यामुळेच 'डेव्हिल इज इन डीटेल्स' या वाक्प्रचाराचा जन्म झाला असावा. म्हणजे घोषणांचे फोले पाखडून त्यातील सत्याचे सत्त्व निकेपणाने वेगळे केल्याखेरीज या घोषणांचा खरा अर्थ उमगत नाही. तेव्हा या पुनर्रचना घोषणेचे सविस्तर विश्लेषण अत्यावश्यक ठरते. विशेषत: राजद्रोहासारखे मागास कलम या नव्या संहितेमुळे रद्दबातल होणार असल्याची घोषणा केली जात असेल तर त्यामुळे या विश्लेषणाचे महत्त्व अधिक. या पुनर्रचनेचा प्रयत्न गेली तीन वर्षे सुरू होता. करोनाकाळात या संदर्भात पहिल्यांदा हालचाली सुरू झाल्या. अनेक राज्यांचे राज्यपाल, न्यायपालिका इत्यादींस या नव्या संहितेबाबत कळविण्यात आले.

**परवाच्या १ ऑगस्टला दुपारी दोनच्या सुमारास आमचं विमान मांडले किंवा मंडालेला उतरलं. लोकमान्यांच्या आठवणी आणि आख्यायिका' या टिळकभक्त स. वि. बापट यांनी संपादित केलेल्या पुस्तकामधील लोकमान्यांच्या मंडाले वास्तव्याच्या काळातल्या त्यांनी नोंदविलेल्या अनेक प्रसंगांच्या इथे उतरताच आठवणी मनात येऊन गेल्या.**

# लोकमान्यांच्या तपोभूमीत..

आत्ताचा म्यानमार म्हणजे पूर्वीचा ब्रह्मदेश! ईशान्य भारताच्या चार राज्यांची सीमा या शेजारी राष्ट्राला भिडलेली आहे. शिवाय खूप जुन्या काळापासून आपले परस्परसंबंधही आहेत. पण असं असूनही आपली अवस्था दोन भाऊ शेजारी, भेट नाही संसारी; अशी! त्यामुळेच ब्रह्मदेशाबद्दल कुतूहल होतं आणि जमेल तेव्हा तिथे जाण्याची तीव्र इच्छाही. खरं तर २०२० मध्ये लोकमान्य टिळकांची स्मृती शताब्दी मांडले शहरात प्रत्यक्ष जाऊन, शक्य झालंच तर तिथे; जिथे टिळक कारावासात होते – त्या तुरुंगामध्ये जाऊन हा कार्यक्रम करावा असा भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेत आमचा विचार होता. पण करोनाच्या साथीच्या त्या दिवसांत ते शक्य झालं नाही. पण त्या वर्षी भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेने दिलेल्या आणि विख्यात शिल्पकार राम सुतार यांनी तयार केलेल्या लोकमान्यांच्या अर्धपुतळय़ाचे अनावरण मांडलेच्या भारतीय वकिलातीत एका कार्यक्रमात



घडून आले. त्या वेळी करोनामुळे हुकलेला तो भाग्ययोग या वर्षी मात्र जुळून आला. यंगूनच्या आमच्या स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्रात लोकमान्यांच्या तैलचित्राचं अनावरण करण्याच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने तिथे जायचं होतंच; त्याला जोडून मग मांडलेचा प्रवासही ठरविला, आणि तोही चक्क १ ऑगस्टचा मुहूर्त साधता येईल या पद्धतीने. मांडले किंवा मंडालेला जायला भारतातून थेट विमानसेवा नसल्यातच जमा आहे. त्यामुळे मग बँकॉकला जाऊन थेट मांडले गाठले. सुमारे साडेबारा लाख लोकसंख्येचं हे शहर. त्याचा थोडासा अलीकडचा, आधुनिक भाग सोडला तर आपल्या धुळे, जळगावसारखंच. शहराच्या बाजूबाजूने इरावती नदी वाहते, तिच्या नावाचा इथला उच्चार इरावदी. १ ऑगस्टच्या संध्याकाळी तिथल्या भारतीय वकिलातीने टिळक पुण्यतिथीचा विशेष कार्यक्रम योजला होता. पुतळा नेहमीसाठी स्थापित असला तरी तो कार्यक्रमापुरता व्यासपीठावर आणण्यात आला होता. खुद्द मांडलेसारख्या टिळकांच्या तपोभूमीत, अगदी टिळक जिथे राहायचे तिथे नाही, तरी तिथून जवळच भारतीय वकिलातीत या कार्यक्रमाला १ ऑगस्टच्याच दिवशी उपस्थित राहायला मिळालं याचं खूप समाधान मनात होतं. भारतीय वकिलातीच्या आवारातच आपल्या राष्ट्रीय ध्वजाच्या स्तंभाला लागून तीन शिलालेख पूर्वीच लावले आहेत. त्यात लोकमान्य टिळक, लाला लाजपतराय आणि नेताजी सुभाष या तीनही स्वातंत्र्यसैनिकांनी मांडलेच्या कारावासात काही ना काही काळ घालविला असल्याची तपशीलवार नोंद आहे.

## अमृत स्फूर्ती गीत.. .!

पाऊणशे वर्षे झाली,
भारत स्वतंत्र झाला!
गाऊं अमृत गीत,
जनहो चला चला /धृ/

अगणित वीर देती आहुती
त्या यज्ञाची पवित्र माती,
तिलक कपाळी लावुनि भाळीं,
वंदन करुं त्यांतला /१/

कुणि आचरिती सत्य, अहिंसा
कुणि घेई सशस्त्र क्रांतीचा वसा,
एकच अंतिम ध्येय तयांचे,
स्वतंत्रतेचा विडा उचलला /२/

भेद तयांनी मुळि न मानला,
तिरंगी झेंडा हाती घेतला,
देशभक्तीचे व्रत घेउनी
त्यागकळस गाठला /३/

स्वतंत्रतेच्या त्या योद्ध्यांनी ,
मार्ग दाविला जीवन अर्पुनी,
स्फूर्ती तयांची झणीं घेउनी ,
तनमन वाहूं विकासाला /४/

जय जवान,जय किसान,
जय विज्ञान, जय अनुसंधान
या मंत्राचे गाऊं गान,
भारत देश महान, भारत देश महान,
जगी वाढवूं त्याची शान /५/

कवी
रमेश महाजन

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ठाणे रुग्णालयातील मृत्यूचे सत्र सुरूच

## » रुग्णालयात एक महिन्याच्या बाळासह चार रुग्णांचा मृत्यू

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**कळवा येथील ठाणे पालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात मृत्यूचे सत्र सुरूच. गुरुवारी रुग्णालयात ५ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर काल रविवारी अवघ्या दहा तासात १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याची बातमी समोर आली होती. या घटनेने एकच खळबळ उडाली असताना आता आज सोमवारी चार रुग्णांचा मृत्यू झाल्याची बातमी समोर येत आहे.**

कळवा रुग्णालयावर सध्या प्रचंड ताण आहे. रुग्णालयात मलेरिया आणि डेंग्यूच्या रुग्णांवर उपचार सुरू आहेत. पण गेल्या ४ दिवसात २२ रुग्णांचा मृत्यू झाल्याने रुग्णालय प्रशासनाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. रविवारी मृत्यू झालेल्या १७ पैकी १३ रुग्ण हे आयसीयूमधील होते तर ४ रुग्णांवर जनरल वॉर्डमध्ये उपचार सुरू होते. या आधी १० ऑगस्ट रोजी एकाच दिवशी ५ जणांचा मृत्यू झाला होता. जे रुग्ण दगावले त्यातील काही रुग्णांचा अपघातग्रस्त, तर काहींचा अल्सर, यकृत व्याधी, निमोनिया, विष प्राशन, डायलेसीस, डोक्याला मारहाण, लघवी संसर्ग, ऑक्सिजनची कमतरता, रक्तदाब




कमी होणे, ताप आदींमुळे मृत्यू झाल्याचे रुग्णालय प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मृतांमध्ये एका ८३ वर्षीय वृद्ध महिलेसह ८१ वर्षीय पुरुषाचा समावेश आहे. तर उर्वरितांमध्ये ३३ ते ८३ वयोगटातील रुग्णांचा समावेश आहे. दरम्यान, अपुऱ्या मनुष्यबळामुळे एकीकडे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयावरील ताण वाढला असताना अपघात विभागातील सर्वच डॉक्टर राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ अनिरुद्ध माळगांवकर यांच्या त्रासाला कंटाळून हे सर्व डॉक्टर्स राजीनामा देण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान अपघात विभागात अपघाताच्या दररोजच्या केसेसचे प्रमाण हे २०० वर गेले असून जर या सर्व डॉक्टर्सने एकत्रित राजीनामा दिला तर अपघात विभागाची यंत्रणाच ठप्प होण्याची शक्यता आहे.

### डॉक्टरांची अक्षरश: दमछाक

» सध्या इतर केसेस आणि अपघातांच्या केसस येण्याचे प्रमाण वाढल्याने रुग्णालयातील डॉक्टरांची विशेष करून अपघात विभागातील डॉक्टरांची अक्षरशः दमछाक होत आहे. या विभागात एकूण सहा डॉक्टर्स काम कार्यरत आहेत. अपघात झालेल्यांवर उपचार करायचे कि वरिष्ठांचा मानसिक त्रास सहन करायचा अशा दुविधा अवस्थेत सध्या हे सर्व डॉक्टर्स आहेत. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ अनिरुद्ध माळगांवकर हे मानसिक त्रास देत असल्याचे इथल्या डॉक्टर्सचे म्हणणे असून नाव न सांगण्याच्या अटींवर त्यांनी ही माहिती दिली आहे. यासंदर्भात पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी माहिती घेतल्यानंतर यावर भाष्य केले जाईल असे अशी प्रतिक्रिया दिली आहे. मात्र यामागे शिस्तीचा भाग असल्याचेही त्यांनी सांगितले. केवळ या प्रकरणावर न बोलता एकंदर शिस्त लागणेही महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# मग कार्यकर्त्यांनी का लढायचं ?

## » काका पुतण्याच्या भेटीवर राऊत संतापले

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार यांची पुण्यात भेट घेतली. याआधीही अजित पवारांनी शरद पवारांशी चर्चा केली. अशा भेटीने महाराष्ट्रात मोठा संभ्रम निर्माण होतोय. ज्यांनी आपल्या विरोधी भूमिका घेऊन भाजपशी हातमिळवणी केली, ते आपले नातेवाईक असू शकत नाहीत. आम्ही एकनाथ शिंदे यांच्यासोबत चहापान केलं तर...? पण आम्ही तसं करणार नाही कारण शिवसेनेचा डीएनए वेगळा आहे. आम्ही असलं ढोंग करणार नाही. राजकारणातल्या भीष्मपितामहाकडून असं वर्तन अपेक्षित नाही, अशा शब्दात ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी काका पुतण्यांच्या भेटीवर नाराजी व्यक्त करत खडे बोल सुनावले.**



### रोहित पवारही उद्धव गटाचे प्रवक्ते झाले ?

» राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनीही शिंदे गटातील आमदारांवर ते परत ठाकरे गटात जातील अशी टीका केली होती. या टीकेला शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. जे सत्तेसाठी सरकारमध्ये गेले आहेत ते नाराज राहणार नाहीत असं होणार नाही, ते नाराज राहणारच. फक्त उद्धव ठाकरे त्यांना घेतील की नाही हे पाहावं लागेल, असे रोहित पवार म्हणाले. रोहित पवारांच्या या टीकेला संजय शिरसाटांनी प्रत्युत्तर दिलं आहे. आपल्याला काय करायचं दुसऱ्या पक्षात काय चाललंय ते, अशी सूचना वजा टीका त्यांनी केली.

अजित पवार-शरद पवार यांच्या पुण्यातील भेटीने राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार भाजपने मुख्यमंत्रिपदाचा शब्द न पाळल्याने अजित पवार पुन्हा माघारी फिरणार की शरद पवार आपली भूमिका बदलून भाजपशी हातमिळवणी करणार, याबाबतच्या वेगवान चर्चा सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी माध्यमांच्या प्रश्नांना उत्तरे देताना काका पुतण्यांना फैलावर घेतलं. नातीगोती घरात सांभाळायची असतात, बाहेर नव्हे असं सांगताना आपल्या विचारांशी विरोधी भूमिका घेणारा आपला नातलग असू शकत नाही, असंही राऊत म्हणाले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले काल मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यासाठी आले होते. त्यावेळी राष्ट्रवादीच्या भूमिकेसंदर्भात आमच्यात चर्चा झाली. संभ्रमाच्या वातावरणाने मविआवर काय परिणाम होऊ शकतो, यावर आमचं बोलणं झालं. राष्ट्रवादीचे नेते सांगत आहेत की- काका पुतणे भेटले तर त्यात वावगं काय, पण मला त्यांना विचारायचंय की कार्यकर्त्यांनी एकमेकांविरोधात रस्त्यावर का लढायचं? उद्या जर आम्ही एकनाथ शिंदे यांच्याबरोबर किंवा त्यांच्या बेईमान गटाबरोबर चहा प्यायला बसायला लागलो, आम्ही नेत्यांनी त्यांच्याबरोबर बसायचे, नाती गोती व्यवहार सांभाळायचे आणि कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्यांसाठी, विचारधारेसाठी एकमेकांविरोधात लढायचं, हे काही बरोबर नाही. शिवसेनेच्या विचारामध्ये अशा प्रकारचं ढोंग नाही, असं म्हणत राऊतांनी काका पुतण्याला सुनावलं. ही लढाई देशाची आणि राज्याची आहे.

# एक टीम अगोदर गेलीय, दुसरी टीम नंतर जाईल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

अजित पवार आणि शरद पवारांच्या गुप्त बैठकीनंतर महाविकासआघाडीत अस्वस्थता असल्याचं पाहायला मिळालं आहे. पवारांच्या बैठकीनंतर अनेक प्रतिक्रिया येत आहे. आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एक टीम आधी पाठवली दुसरी पण लवकरच जाईल, असे राज ठाकरे म्हणाले आहे.अजित पवार आणि शरद पवारांच्या गुप्त बैठकीनंतर अनेक चर्चांना उधाण आले आहे. मनसेची वांद्रे एमआयजी क्लबमध्ये बैठक होणार आहे.

मनसे नेते, सरचिटणीस, प्रमुख पदाधिकारी यांना राज ठाकरे मार्गदर्शन करणार आहेत. सध्याच्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मनसेची ही महत्त्वाची बैठक आहे. राज ठाकरे म्हणाले, एक टीम आधी पाठवली आहे दुसरी पण लवकरच जाणार आहे. आतून सगळे ऐकमेकांना मिळाले आहेत. २०१४ सालापासून हे सर्व सुरु आहे. शरद पवार आणि अजित पवार यांना भेटण्याची जागा 'चोर'डीया यांच्या घरीच मिळाली हे कमाल आहे. राजकारणातील सध्याचा घोळ पाहता महापालिका निवडणुका होणार नाहीत, असं वक्तव्य मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले आहे. तसंच राज ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना लोकसभेच्या तयारीला लागा असे आदेश दिले आहेत. राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात सध्या जो राजकीय घोळ झालाय त्यावरुन वाटत नाही पालिका निवडणुका आता लागतील असे वातावरण सध्या दिसत नाही. परंतु आता निवडणुका लोकसभेच्या लागतील.

त्यासाठी आम्ही चाचपणी आणि तयारी सुरू केली आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डयांवर राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पनवेलच्या मेळाव्यात या विषयी सविस्तर बोलणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावरुन मनसे आक्रमक झाली आहे. राज ठाकरेंच्या सभेनंतर मनसे खड्डे बुजवा मोहीम राबवणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डे आता मनसैनिक बुजवणार आहे.

# रस्त्याचा बांधकाम खर्च 18 कोटींवरून थेट 250 कोटी प्रतिकिमी कसा झाला ?

## » कॅगने केंद्रीय वाहतूक मंत्रालयाचे टोचले कान

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**एखाद्या प्रकल्पाला होणारा विलंब किंवा त्यातील कच्चा माल वा इतर गोष्टींमुळे प्रकल्पाच्या एकूण किंमतीत वाढ झाल्याची अनेक प्रकरणं समोर आली आहेत. या वाढलेल्या खर्चाचा भार शेवटी देशाच्या करदात्यांवरच येऊन पडत असल्याची टीकाही अनेकदा केली जाते. मात्र, आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या खात्याच्या अर्थात रस्ते वाहतूक खात्याच्या एका प्रकल्पाची किंमत तब्बल १४ पटींहून जास्त वाढल्याचा प्रकार समोर आला आहे. यासंदर्भात कॅग अर्थात भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षकांनी मोदी सरकारवर ताशेरे ओढले आहेत.**

कॅगच्या ताज्या अहवालामध्ये दिल्ली ते गुरुगाव या राष्ट्रीय महामार्ग ४८ वरील २९.०६ किलोमीटरच्या टप्प्याचा उल्लेख करण्यात आला आहे. द्वारका एक्स्प्रेस वेवरील या मार्गासाठी प्रकल्प मंजूर झाला तेव्हाचा खर्च होता १८ कोटी २० लाख रुपये प्रती किलोमीटर इतका. पण आता या प्रकल्पाच्या बांधकामाचा खर्च तब्बल २५० कोटी ७७ लाख इतका वाढला आहे. अर्थात, प्रकल्प खर्चात १४ पटींहून जास्त वाढ झाली आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या किंमत वाढीची जोरदार चर्चा दिल्लीच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. या २९.०६ किलोमीटर मार्गामध्ये ८ एलिव्हेटेड मार्गिका तर सहा सामान्य मार्गिकांचा समावेश आहे. दिल्ली-गुरगाव राष्ट्रीय महामार्ग ४८ वरील वाहतूक कोंडीच्या



समस्येवर उपाय म्हणून हा प्रकल्प हाती घेण्यात आला. भारत परियोजना २०१७-१८ ते २०२०-२१ चा भाग म्हणून या प्रकल्पाचं नियोजन करण्यात आलं आहे. कॅगनं आपल्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे, द्वारका एक्स्प्रेस वे आधी हरियाणा सरकारकडून बांधला जाणार होता. यासाठी हरियाणा सरकारने १५० मीटर रुंदीचा पट्टा अधिग्रहीत केला.

मात्र, यानंतर या प्रकल्पासंदर्भात हरियाणा सरकारकडून कोणतीही प्रगती न झाल्यामुळे हा प्रकल्प भारत परियोजनेत समाविष्ट करण्यात आला. त्यासाठी हरियाणा सरकारने ९० मीटर रस्ता रूंदीचा पट्टा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला मोफत हस्तांतरीत केला. प्रकल्पाच्या आधीच्या नियोजनानुसार १४ सामान्य मार्गिकांचा महामार्ग बांधला जाणं अपेक्षित होतं. त्यासाठी हरियाणा सरकारने हस्तांतरीत केलेला ९० मीटर रुंदीचा पट्टा पुरेसा होता. मात्र, कोणतंही स्पष्ट कारण न देताच या ठिकाणी १४ सामान्य मार्गिकांच्या रस्त्याऐवजी ८ उन्नत मार्गिका व ६ सामान्य मार्गिका असा बदल करण्यात आला. इतक्या मोठ्या बांधकामामुळेच या प्रकल्पासाठी तब्बल ७ हजार २८७ कोटी २९ लाख रुपये एवढी मोठी रक्कम मंजूर करण्यात आली. त्यानुसार प्रकल्पाच्या प्रत्येक किलोमीटरचा एकूण खर्च २५० कोटी ७७ लाख इतका वाढला, असंही कॅगनं आपल्या अहवालात म्हटलं आहे.

### दोन राज्यांमधील वाहतूक मंदावली

» नितीन गडकरींकडे असणाऱ्या वाहतूक मंत्रालयाने दिलेल्या उत्तरावरही कॅगनं आक्षेप घेतला आहे. मंत्रालयाच्या सांगण्यानुसार, या मार्गाला येऊन मिळणारे इतर अनेक मार्ग येऊन मिळतात. त्यामुळे दोन राज्यांमधील वाहतूक मंदावली असती. याचसाठी हा मोठा उन्नत मार्ग बांधण्याचा बदल प्रकल्पात करण्यात आला. मात्र, यावर कॅगनं मंत्रालयाचेच कान टोचले आहेत. या मार्गावर ज्या ठिकाणी इतर मार्ग येऊन मिळतात, त्या भागात उड्डाणपूल किंवा अंडरपास बांधता आले असते. तेवढ्यासाठी ८ मार्गिकांचा पूर्ण रस्ताच उन्नत करणं योग्य ठरत नाही, असंही कॅगनं म्हटलं आहे. द्वारका एक्स्प्रेस वेला कोणत्याही सविस्तर अहवालाशिवायच मंजुरी देण्यात आल्याचंही कॅगनं म्हटलं आहे.

# हिमाचलमध्ये पावसाचा कहर : ५१ जणांचा मृत्यू

## » शिवभक्तांवर काळाचा घाला! मंदिरावर दरड कोसळली,9 ठार

।शिमला।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**हिमाचल प्रदेशात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने कहर केला आहे. राज्यात विविध ठिकाणी ढगफुटी आणि भूस्खलनामुळे ५० हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. शिमला, सोलन, कांगडा येथे प्रत्येकी एका ठिकाणी, तर मंडीमध्ये दोन ठिकाणी ढगफुटी झाली. यात मंडी, राजधानी शिमला, सोलन, कांगडा-हमीरपूर, चंबा, सिरमौरमध्ये नागरिकांचा मृत्यू झाल्याचे समजते आहे.**

मात्र, अशी अनेक ठिकाणे आहेत जिथे किती प्रमाणात नुकसान झाले आहे, किती लोकांचा जीव गेला आहे याची माहिती मिळू शकलेली नाही. स्टेट इमर्जन्सी ऑपरेशन सेंटरच्या माहितीनुसार, राज्यात ७५१ मार्गांसह ४६९७ वीज ट्रान्सफॉर्मर आणि ९०२ पाणीपुरवठा योजना बंद आहेत.

मंडी जिल्ह्यात सर्वाधिक ३४५ मार्ग, शिमला येथील ११५ आणि हमीरपूरमधील १२४ मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. मंडी जिल्ह्यात २६७२ आणि शिमल्यात ३४८ इलेक्ट्रिकल ट्रान्सफॉर्मर बंद पडले आहेत. दरम्यान, राज्यात पुढील २४ तासांसाठी रेड अलर्ट जारी केला गेला असल्याची माहिती आयएमडीचे उपसंचालकांनी दिली आहे. यात चंबा, कांगडा,



कुल्लू, मंडी, सोलन, शिमला, सिरमौर आणि हमीरपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रशासन सतर्क झाले आहे. याबाबत समोर आलेल्या माहितीनुसार, श्रावण महिन्यातील सोमवार असल्याने या मंदिरात शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती.

सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान मंदिरात भूस्खलनाची घटना घडली. मुसळधार पावसामुळे शिव बावडी येथील मंदिरावर दरड कोसळली.

त्यामुळे मंदिरात उपस्थित २५ हून अधिक लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहेत. आतापर्यंत २ मुलांसह ५ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. तसेच उर्वरितांचा शोध सुरू आहे.

ढिगाऱ्याखाली अडकलेल्या भाविकांचा सध्या शोध सुरू असून सतत सुरू असलेल्या पावसामुळे बचावकार्यामध्ये अडचणी येत आहेत. हिमाचलचे मुख्यमंत्री सुकविंदर सिंग यांनी याबाबत बोलताना आज सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास मोठी दुर्घटना घडली. आतापर्यंत पाच मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. श्रावणातील शेवटचा सोमवार असल्याने सर्व जण दर्शनासाठी आले होते. सेना, पोलिस आणि एनडीआरएफच्या मदतीने लोकांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले आहे.

### लाल किल्ल्यावर यावेळी काय विशेष

» शिमलाचे एसपी संजीव कुमार गांधी यांनी सांगितलं की, भूस्खलनात एक शिव मंदिर कोसळलं. त्यामुळे आजूबाजूच्या इमारतींनाही धोका निर्माण झाला आहे. अनेक लोक अडकले आहेत. शिव मंदिराच्या ठिकाणी ढिगाऱ्याखाली अडकले असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहेत. या परिसरात अद्यापही दरडी कोसळत असल्याने बचावकार्यात अडथळे येत आहेत. स्थानिकांच्या मते, अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकले असल्याचं बोललं जात आहे.

# तू ट्रॉफी आणि मन दोन्ही जिंकलंस भावा!



बिग बॉस OTT 2 ची फायनल सोमवारी १४ ऑगस्टला पार पडली. सलमान खान या फायनलचं होस्टिंग करत होता. फायनलमध्ये शेवटच्या क्षणी फुकरा इन्सान म्हणजेच अभिषेक मल्हान आणि एल्विश यादव टॉप 2 मध्ये होते. अखेर या दोघांपैकी एल्विश यादवने फायनलमध्ये बाजी मारली. एल्विश विजयी झाल्यावर त्याच्या फॅन्सला खुप आनंद झाला. एल्विशने जिंकल्यावर एक अशी कृती केली त्यामुळे त्याने सर्वांचं मन जिंकलं. सलमान खानने एल्विशचं विजेता म्हणुन नाव घोषित केलं. एल्विशने बिग बॉस OTT 2 च्या ट्रॉफीवर स्वतःचं नाव कोरलं. ट्रॉफी मिळवल्यावर एल्विश जसं आधी म्हणाला होता तसं त्याने ती ट्रॉफी अभिषेकच्या हातात ठेवली. इतकंच नव्हे मनीषा राणीला सुद्धा एल्विशने बोलावलं. या तिघांनी ट्रॉफी आणि सलमान खान सोबत फोटो काढला. एकुणच जिंकल्यावर सुद्धा एल्विशने जो मोठेपणा दाखवला त्याचं सगळीकडे कौतुक होतंय. बिग बॉस ओटीटी 2 अभिषेक आणि एल्विश टॉप 2 उरले होते. मनीषा राणी बिग बॉस ओटीटी 2 मधून बाहेर गेली होती. शेवटी सलमान खानने सर्वांना सांगितलं की, १५ मिनिटात एल्विश आणि अभिषेकला वोट करण्याची जनतेला संधी आहे. १५ मिनिटात एल्विश आणि अभिषेकसाठी वोटींग लाईन्स ओपन झाल्या. आणि १५ मिनिटात वोट्स मध्ये एल्विशने बाजी मारली आणि बिग बॉस ओटीटी 2 वर स्वतःचं नाव कोरलं. बिग बॉस OTT सीझन 2 चा विजेता ठरलेल्या एल्विशला 25 लाख रुपये आणि बीबी ओटीटीची चमकणारी ट्रॉफीही मिळाली. बिग बॉसच्या एतिहासात पहिल्यांदाच वाईल्ड कार्ड एंट्रीने आलेल्या स्पर्धकाने ट्रॉफीवर नाव कोरलं. 17 जूनपासून सुरू झालेल्या 'बिग बॉस ओटीटी 2' मध्ये 13 स्पर्धक दिसल होते.

# तमन्ना भाटियाचा सन्मान



अभिनेत्री तमन्ना भाटिया तिच्या कामामुळे सध्या जोरदार चर्चेत आहे. वेब सिरीज 'जी कारदा, लस्ट स्टोरीज 2 , जेलर आणि भोला शंकर' या आगामी प्रोजेक्ट्स साठी ती चर्चेचा विषय ठरली आहे. यंदाचा अभिमानाचा क्षण म्हणजे ती ग्रँड मार्शल म्हणून आगामी एनजे इंडिया डे परेडचं नेतृत्व करणार होती. तमन्ना भाटिया तिच्या करिष्माई ऑन-स्क्रीन उपस्थिती आणि अष्टपैलू अभिनय कौशल्यासाठी ओळखली जाते. या अभिनेत्रीने भारतातील एनेक भाषांमधील चित्रपटांमध्ये काम करत आपल्या अभिनयाने प्रेत्रकांची मने जिंकली आहेत . सिनेसृष्टीतील रसिकांमध्ये ती एक प्रिय व्यक्ती बनली आहे. 'एनजे इंडिया डे परेड'च्या ग्रँड मार्शल म्हणून तिची निवड केवळ तिची शानदार कारकीर्दच नव्हे तर मनोरंजन उद्योगातील तिचा प्रेरणादायी प्रवास देखील प्रतिबिंबित करते. या परेडमध्ये भारतीय-अमेरिकन सामाजिक दिनदर्शिकेवर प्रकाश टाकण्यात आला जो भारतीय संस्कृती, परंपरा आणि राष्ट्राच्या कर्तृत्वाच्या नेत्रदीपक प्रदर्शनात विकसित झाला.

हा कार्यक्रम रंग, संगीत, नृत्य आणि फ्लोट्सचा कॅलिडोस्कोप होता, ज्यामध्ये भारताचे सार आणि डायस्पोरा समाविष्ट होते. परेडच्या नेत्याची तमन्ना भाटियाची भूमिका संस्कृतीला जोडण्यासाठी आणि एकात्मतेला प्रोत्साहन देण्यासाठी तिची बांधिलकी दर्शवते आणि परेडमध्ये तिचा सहभाग या कार्यक्रमाचे सांस्कृतिक महत्त्व वाढवण्यासाठी तयार झाला, ज्याने अधिक वैविध्यपूर्ण आणि उत्साही प्रेक्षक आकर्षित केले. तमन्ना भाटिया देखील आगामी प्रकल्पांच्या रोमांचक लाइनअपसाठी तयार आहे. यामध्ये मल्याळम चित्रपट बांद्रा, तमिळ चित्रपट अरनामनाई 4 आणि जॉन अब्राहम सोबतचा हिंदी उपक्रम वेदा यांचा समावेश आहे.

# प्रियंका चोप्रा रडली

प्रियंका चोप्रा आणि निक जोनास हे कपल सोशल मिडीयावर चर्चेत असतं. प्रियंका आणि निक यांची जोडी सोशल मिडीयावर कमालीची पसंत केली जाते. प्रियंकाचं नव्यावर किती प्रेम आहे याचा अनुभव नुकताच आला. निक जोनासचा कॉन्सर्टमधला एक व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झालाय. या व्हिडीओत प्रियंका चोप्राच्या डोळ्यात नवऱ्याला लाईव्ह परफॉर्म करताना पाहून डोळ्यात पाणी आलं. बघुया सविस्तर काय झालं.


अलीकडेच.. प्रियंका चोप्राने तिच्या इंस्टाग्राम हँडलवर तिचा पती निकसाठी एक अतिशय गोड नोट लिहिली. या पोस्टमध्ये प्रियंकाने निकला त्याच्या नवीन कॉन्सर्टसाठी शुभेच्छाही दिल्या आहेत. निक जोनासचा कॉन्सर्ट सोशल मिडीयावर तुफान व्हायरल झाला. या कॉन्सर्टमध्ये प्रियंका सुद्धा उपस्थित होती. यावेळी नवऱ्याला स्टेजवर लाईव्ह परफॉर्म करताना प्रियंकाच्या डोळ्यातील अश्रू पुसताना दिसली. प्रियंकाच्या डोळ्यात आलेलं हे पाणी निश्चितच आनंद होतं प्रियंकाने तिच्या चिठ्ठीत लिहिले की, 'निक तू एक चुंबक आहेस आणि मी खूप भाग्यवान आहे की तू माझ्यासोबत आहेस. एक नवीन आणि सुंदर प्रवास सुरू केल्याबद्दल निकचे अभिनंदन.



# कौन बनेगा करोडपती !

कौन बनेगा करोडपतीचा 15वा सीझन सोमवारी 14 ऑगस्टपासून सुरू होत आहे. या शोचे होस्ट पुन्हा एकदा अमिताभ बच्चनच असतील. या सीझनमध्ये शोचा फोकस तंत्रज्ञानाची वाढ आणि त्यामुळे जीवनात होणारे बदल यावर असेल. शोच्या या नवीन सीझनमध्ये निर्मात्यांनी 4 मोठे बदल केले आहेत. 2000 साली सुरू झालेल्या केबीसीला 23 वर्षे पूर्ण झाली आहेत. या 23 वर्षांत शोचा तिसरा सीझन सोडला तर इतर सर्व सीझन अमिताभ बच्चन यांनी होस्ट केले आहेत. या शोच्या तिसऱ्या सीझनमध्ये शाहरुख खान होस्ट होता. शोमध्ये 'सुपर संदूक' सादर केला जाणार आहे. तो गेममध्ये ट्विस्ट आणेल. याद्वारे स्पर्धकांना गमावलेल्या गोष्टी परत मिळवता येणार आहेत. याशिवाय 'देश का सवाल' नावाचा नवीन एलिमेंटही जोडला जाणार आहे. यामुळे जास्तीत जास्त प्रेक्षकांचा सहभाग होण्यास मदत होईल.

# उद्या काही तरी मोठं घडतयं



'पठाण'च्या जबरदस्त यशानंतर सिद्धार्थ आनंद पुढे काय करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून होत. भारतीय सिनेसृष्टीतील वॉर डायरेक्टर अशी ख्याती असलेल्या या दिग्दर्शका कडून पुढील प्रोजेक्ट काय असणार याची सगळ्यांना उत्सुकता होती आणि ते सध्या "फायटर "वर काम करत असल्याचं समजतंय. हृतिक रोशन, दीपिका पदुकोण आणि अनिल कपूर यांच्या सोशल मीडिया वर उद्या काहीतरी मोठे येत असल्याचे संकेत देणाऱ्या पोस्ट शेअर केल्या आणि या चर्चांना उधाण आलं आहे. सूत्रांकडून सिद्धार्थ आनंदने बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या मोशन पोस्टरचे अनावरण करण्यासाठी स्टेज सेट करत असल्याच समजतं आहे. सूत्र अस सांगतात चित्रपटाचे निर्माते स्वातंत्र्य दिनाच्या खास दिवशी मोशन पोस्टरवर काम करत आहेत आणि त्याला 'स्पिरिट ऑफ फायटर' म्हटले जाते आणि ते प्रेक्षकांसाठी काहीतरी नवीन आणि उत्साहवर्धक असणार आहे.

# फालतू विधानापेक्षा आत्मपरीक्षण करा

## » क्रिकेटपटू व्यंकटेश प्रसादांनी टोचले टीम इंडियाचे 'कान'

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारतीय संघाच्या पराभवानंतर व्यंकटेश प्रसाद यांनी भारतीय संघाच्या कामगिरीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. गेल्या वर्षी टी-२० विश्वचषकासाठी पात्र ठरू न शकलेल्या संघाविरुद्धची मालिका गमावणे लज्जास्पद असल्याचे त्यांनी म्हटले आहे.**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारताला पराभवाचा सामना करावा लागला आहे. पाच सामन्यांच्या मालिकेत टीम इंडियाचा २-३ अशा फरकाने पराभव झाला. या पराभवानंतर भारतीय संघावर मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. भारताचा माजी क्रिकेटपटू व्यंकटेश प्रसाद यांनीही भारतीय संघाच्या वृत्तीवर आणि व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले आहेत.



### जिंकण्याच्या मानसिकतेची कमतरता

» एका चाहत्याने व्यंकटेश यांना भारतीय संघ व्यवस्थापन आणि टी२० कर्णधारपदाबद्दल त्यांचे मत विचारले. त्यावर त्याने म्हटलं आहे की, पराभवासाठी त्यांना जबाबदार धरले पाहिजे. प्रक्रिया आणि अशा शब्दांचा आता गैरवापर होत आहे. भारताला त्यांचे कौशल्य सुधारण्याची गरज आहे. त्यांच्यात जिंकण्याची मानसिकतेची कमतरता आहे. गोलंदाज फलंदाजी करू शकत नाहीत, फलंदाज गोलंदाजी करू शकत नाहीत. हे महत्त्वाचे आहे की तुम्ही हो म्हणणाऱ्या लोकांचा शोध घेऊ नका. तुम्ही आणि कोणीतरी तुमचा आवडता खेळाडू असल्याने आंधळे होऊ नका, अधिक चांगले पहा. असेही त्यांनी सुनावले आहे.

व्यंकटेश प्रसादने यापूर्वीही भारतीय संघावर हल्ला चढवला आहे आणि खराब कामगिरी करणाऱ्या खेळाडूंवर टीका केली आहे. मात्र, त्यांचे ट्विट कोणाला लक्ष्य करण्यासाठी नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे. त्याला फक्त संघाचे भले करायचे आहे.

वेस्ट इंडिजविरुद्ध भारताच्या पराभवानंतर व्यंकटेशने ट्विट केले की, भारत हा अलीकडच्या काळात अत्यंत मध्यम दर्जाचा मर्यादित षटकांचा संघ आहे. काही महिन्यांपूर्वी टी-२० विश्वचषकासाठी पात्र ठरू शकलेल्या वेस्ट इंडिज संघाकडून त्यांना पराभव पत्करावा लागला आहे. आशा आहे की, ते फालतू विधान करण्याऐवजी आत्मपरीक्षण करतील. व्यंकटेशच्या ट्विटवर एका चाहत्याने लिहिले की, वेस्ट इंडिजचा संघ टी-२० नव्हे तर एकदिवसीय विश्वचषकातून बाहेर आहे. प्रत्युत्तरादाखल व्यंकटेशने लिहिले, केवळ ५० षटकेच नाही, तर वेस्ट इंडिज संघ गेल्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये टी-२० विश्वचषकासाठी पात्र ठरण्यात अपयशी ठरला होता. भारताची खराब कामगिरी पाहून वाईट वाटते आणि प्रक्रियेच्या वेशात दडपले जाते.

### कधी कधी पराभूत होणेही चांगले

» मालिका गमावल्यावर कर्णधार हार्दिक पंड्याने व्यक्त केले मत
लौडरहिल - भारतीय क्रिकेट संघाने वेस्ट इंडिज विरुद्धची टी-२० मालिका गमावली आहे. भारताचा ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेत पहिल्यांदाच पराभव झाला आहे. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ मालिकेच्या निर्णायक सामन्यात ८ विकेट्सने पराभूत झाला. वेस्ट इंडिजविरुद्ध ६ वर्षांतील हा पहिला पराभव आहे. पुढील वर्षी टी-२० विश्वचषक फक्त वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणार आहे. अशा परिस्थितीत हा पराभव टीम इंडियासाठी धोक्याचा इशारा आहे. मालिका गमावल्यानंतर भारतीय कर्णधार हार्दिक पंड्याने मुलाखतीत सांगितले की, कोणालाही समजावून सांगण्याची गरज नाही. तो म्हणाला, मी आलो तेव्हा आम्ही लय गमावली आणि परिस्थितीचा फायदा उठवता आला नाही. क्रिझवर राहण्यासाठी मी माझा वेळ घेतला पण मी त्याचा फायदा करून डाव पूर्ण करू शकलो नाही म्हणून निराश झालो. मला विश्वास आहे की आम्ही स्वतःला आव्हान देऊ. आम्ही अधिक चांगले होण्याचा प्रयत्न करतो. आम्हाला जास्त स्पष्टीकरण देण्याची गरज नाही. संघातील मुलं कशी आहेत हे मला माहीत आहे. आमच्याकडे हे माहित करून घेण्यासाठी पूर्ण वेळ आहे. हार्दिक पांड्या म्हणतो की तो फारसे नियोजन करत नाही. कर्णधारपदात तो त्यावेळी वाट्टेल ते करतो. यासोबतच कधी कधी पराभूत होणेही चांगले असते, असे हार्दिकचे मत आहे. पुढे बोलताना तो म्हणाला, "कधी कधी पराभूत होणे चांगले असते. जर आपण सकारात्मक मुद्द्यांकडे पाहिले तर आपण बरेच काही शिकलो आहोत. जिंकणे आणि हरणे हा प्रक्रियेचा एक भाग आहे आणि आम्ही त्यातून शिकत आहोत याची खात्री करून घेणार आहोत. मी जास्त रणनिती आखत नाही आणि माझे मन मला जे सांगेल तेच करतो. एक कर्णधार म्हणून या मालिकेत युवा खेळाडूंनी जबाबदारी स्वीकारली याचा मला यापेक्षा जास्त आनंद मला होऊ शकत नाही.

# स्पर्धेत लय मिळवणे महत्त्वाचे

## » आघाडीचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनचे मत

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक आणि जागतिक क्रमवारीत पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवण्याचे उद्दिष्ट भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन बाळगून असला, तरी त्यासाठी प्रथम जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतून लय मिळवणे महत्त्वाचे असल्याचेही लक्ष्यने सांगितले.यंदाच्या हंगामात कामगिरीत चढ उतार राहिल्यानंतर सेनने जुलै महिन्यात कॅनडा येथील स्पर्धेत विजेतेपद मिळवून अजूनही आपण सर्वोच्च खेळ करू शकतो हे दाखवून दिले होते.**

यंदाच्या हंगामात हे विजेतेपद लक्ष्यसाठी कलाटणी देणारे ठरले. या स्पर्धेनंतर लक्ष्यने अमेरिका आणि जपान येथील स्पर्धेत उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. वयाच्या २१व्या वर्षी जागतिक स्पर्धेत पहिले विजेतेपद पटकावल्यानंतर आता पुन्हा एकदा जागतिक स्पर्धेत आपले कौशल्य दाखविण्यासाठी लक्ष्य सज्ज झाला आहे. डेन्मार्क येथे २१ ऑगस्टपासून जागतिक स्पर्धेला सुरुवात होत आहे. भारतीय बॅडमिंटन संघटनेच्या राष्ट्रीय सर्वोच्च कामगिरी केंद्राच्या उद्घाटनाप्रसंगी बोलताना अलीकडच्या स्पर्धेतील कामगिरी एका आठवडयाने सुरू होणाऱ्या जागतिक स्पर्धेसाठी आत्मविश्वास उंचावणारी ठरेल असे सांगितले. गेल्या काही स्पर्धेतून खेळात सातत्य राहिले आहे. लय मिळत आहे. पण, अजूनही काही गोष्टी शिकायच्या असून, त्यानुसार खेळात सुधारणा करणे आवश्यक असल्याचेही लक्ष्यने या वेळी मान्य केले. "जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत मी खेळण्यास उत्सुक आहे. या स्पर्धेत लय मिळवून मला पाठोपाठ होणाऱ्या आशियाई स्पर्धेत माझे पहिले पदक मिळवायचे आहे. युवा ऑलिम्पिक आणि राष्ट्रकुल स्पर्धेनंतर आता बहु-क्रीडा स्पर्धेचा आणखी एक अनुभव या स्पर्धेच्या निमित्ताने मिळणार आहे. चार वर्षांतून एकदाच अशा स्पर्धा होतात. त्यामुळे या स्पर्धेत चांगली कामगिरी करणे खूप महत्त्वाचे आहे," असे लक्ष्य म्हणाला.



### मोठ्या स्पर्धा जिंकण्यासाठी

» यंदाच्या हंगामातील कामगिरीत झालेल्या चढ उतारामुळे लक्ष्यचे जागतिक मानांकन सहा वरून २५ इतके घसरले. यंदाच्या हंगामात कामगिरीत चढ उतार राहिल्यानंतर सेनने जुलै महिन्यात कॅनडा येथील स्पर्धेत विजेतेपद मिळवून अजूनही आपण सर्वोच्च खेळ करू शकतो हे दाखवून दिले होते मात्र, स्वतःला सावरत लक्ष्यने ११व्या क्रमांकापर्यंत आपले मानांकन सुधारले आहे. कामगिरीत सातत्य राखून मोठ्या स्पर्धा जिंकण्यासाठी मी आता प्रयत्नशील राहीन असे लक्ष्यने सांगितले.

# अखेर सुशील कुमार तुरुंगात आला शरण

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

ज्युनियर कुस्तीपटू सागर धनखड याच्या खून प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी ऑलिम्पिक पदक विजेता सुशील कुमार याने दिल्लीतील तिहार तुरुंगात शरणागती पत्करली आहे. त्याच्यावर दंगल, बेकायदेशीर जमाव आणि गुन्हेगारी कट यासह ज्युनियर कुस्तीपटूचा खून आणि हत्येचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. सागर धनखड खून प्रकरणात जामीन मिळालेला सुशील कुमार २३ जुलै ते ३० जुलै दरम्यान तुरुंगाबाहेर बाहेर होता. त्याच्या गुडघ्याचे ऑपरेशन देखील झाले आहे. या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी १७० पानांचे आरोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. यात सुशील कुमारला धनखड खून प्रकरणात मुख्य आरोपी बनवले आहे. मालमत्तेच्या वादातून सुशील कुमार आणि त्याच्या साथीदारांनी ४ मे २०२१ रोजीच्या मध्यरात्री दिल्लीच्या छत्रसाल स्टेडियमच्या पार्किंगमध्ये २३ वर्षीय सागर धनखड आणि त्याचा मित्र सोनू आणि इतर तिघांवर हल्ला केला होता. यात सागर धनखडचा मृत्यू झाला. सागर आणि त्याच्या मित्रांनी सुशील कुमारचा फ्लॅट सोडला नसल्याने वाद झाला होता. त्यातून धनखडचा खून झाल्याचे प्राथमिक तपासातून आढळून आले आहे. दिल्ली पोलिसांनी मे २०२१ मध्ये दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेत्या सुशीलला मुंडका परिसरातून अटक केली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धनखड हा सुशील कुमार यांच्या मालकीच्या दिल्लीतील मॉडेल टाऊनमधील एका अपार्टमेंटमध्ये पूर्वी राहत होता. यावरून दोघांत वाद झाला होता. नोव्हेंबर २०२२ मध्ये दिल्ली न्यायालयाने सुशील कुमारला आठ दिवसांसाठी अंतरिम जामीन मंजूर केला होता.